




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : ०१५ ● पुणे ● शुक्रवार, दि. २२ नोव्हेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या

### पूर्ववैमनस्यातून टोळक्याचा तिघांवर कोयत्याने हल्ला

**घोरपडी : (आरंभ पर्व)** : बी. टी. कवडे रस्ता येथील देवकी पॅलेस चौकात एका दुकानाबाहेर चौघे मित्र गप्पा मारत थांबले असताना पूर्ववैमनस्यातून एका टोळक्याने कोयत्याने वार केल्यामुळे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. मुंढवा पोलिसांनी महेश गजसिंह, स्वप्निल कोतवाल, करण नागटिळक सर्वजण (रा. टिळेकरनगर, कोंढवा) यासह आणखी एकावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका 28 वर्षाच्या तरूणाने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना घोरपडीतील बी टी कवडे रोडवरील देवकी पॅलेस चौकातील स्वराज अमृततुल्य शेजारी गुरूवारी पहाटे एक वाजता घडली आहे.

### पंडित जाधव यांचे अपहरण करून खून

**पुणे : (आरंभ पर्व)** : नवलाख उंब्रे येथील प्रसिद्ध बैलगाडा मालकाचे अपहरण करून खून करण्यात आला. ही घटना गुरूवारी (दि. 21) उघडकीस आली. खुनामागे खंडणी आणि अन्य देखील काही कारण असल्याचे सांगितले जात आहे. मात्र खुनाचे नेमके कारण काय हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पंडित रामचंद्र जाधव (वय 48, रा. जाधववाडी, नवलाख उंब्रे, ता. मावळ, पुणे) असे खून झालेल्या बैलगाडा मालकाचे नाव आहे.पंडित जाधव यांचे 14 नोव्हेंबर रोजी खंडणीसाठी अज्ञातांनी अपहरण केले. त्यानंतर आरोपींनी 50 लाख रूपयांची खंडणी मागितली होती. दरम्यान आरोपींनी जाधव यांचा खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळला. या प्रकरणी खंडणी विरोधी पथकाने सुरज वानखेडे याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास तळेगाव एमआयडीसी पोलिसांकडून केला जात आहे. पंडित जाधव यांच्याकडे मॉगी नावाचा बैल आहे. त्याने अनेक शर्यतीमध्ये मैदान मारले आहे.

# नववीतील शाळकरी मुलाचा चिरला गळा

## वार्षिक समारंभावरील वादातून वर्गातील विद्यार्थ्याने केला हल्ला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शाळेच्या वार्षिक समारंभाच्या नियोजनावरून नववीमधील विद्यार्थ्यांमध्ये वाद झाला. या वादाचे पर्यावसन मुलांच्या भांडणात झाले. या वादातून एका विद्यार्थ्याचा त्याच्या वर्गातच काचेच्या तुकड्याने गळा चिरण्यात आला. खळबळ उडवून देणारी ही घटना मांजरीमधील एका शाळेत घडली. याप्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून 15 वर्षीय जखमी मुलावर उपचार सुरू करण्यात आले आहेत. पोलिसांनी 14 वर्षीय विद्यार्थ्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. जखमी मुलाने फिर्याद दिली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मांजरीतील एका शाळेत जखमी आणि आरोपी मुलगा इयत्ता नववीमध्ये शिकतो. हे दोघेही एकाच वर्गात आहेत. शाळेमध्ये सध्या वार्षिक समारंभाचे वातावरण आहे. शाळेत त्याचे नियोजन सुरु आहे. या वार्षिक समारंभामध्ये विद्यार्थी आपापली कला सादर करतात. या कार्यक्रमाच्या आयोजनावरून दोघांमध्ये सुरुवातीला वाद झाला होता. त्यानंतर, हे प्रकरण मिटले होते. दरम्यान, मंगळवारी (19 नोव्हेंबर) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास जखमी मुलगा वर्गात बसलेला होता.




आरोपी मुलगा त्याच्या पाठीमागून गुपचूप आला. त्याच्या हातामध्ये काचेचा तुकडा होता. या तुकड्याने त्याच्या गळ्यावर वार केला. काही कळायच्या आतच मुलाच्या गळ्यातून रक्ताची धार सुरु झाली. वर्गातील घाबरलेल्या सर्व मुलांनी आरडाओरडा सुरु केला. हल्ला झालेल्या मुलाने घाबरुन मदतीसाठी आरडाओरडा सुरु केला. दरम्यान, आरोपीने जखमीला ठार मारण्याची धमकी दिली. दरम्यान, आरडाओरडा ऐकून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गात धावले. घडलेला प्रकार आणि रक्त पाहून शिक्षक देखील घाबरले. जखमी मुलाला शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार सुरु करण्यात आले असून त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी मुलाला ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सहायक निरीक्षक दादासाहेब रोकडे करीत आहेत.

# महाराष्ट्रात कुणाचं सरकार येणार?

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडल्यानंतर आता निकालाचे वेध लागले आहेत. विविध संस्थांचे निकालाबाबत एक्झिट पोल समोर आले आहेत. याबाबत ज्येष्ठ राजकीय पत्रकार आणि राजकीय विश्लेषकांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईचे ज्येष्ठ पत्रकार तथा राजकीय विश्लेषक संदीप आचार्य यांनी मुंबईतील जागांबाबत महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे. “अँटी इन्कबन्सीचा राग लोकसभेला निघाला होता. दलित, मुस्लिम मत एकगठ्ठा झालेलं. यंदा चार टक्क्यांनी मतदान वाढलं, हे मतदान लाडक्या बहिणींचं असू शकतं किंवा नवं मतदार असू शकतं, त्याचे फायदे महायुतीला मिळेल. मुंबईतील मतदार हा इंडिपेंडेंट, महाविकास आघाडी मुंबईमध्ये आघाडीवर राहील. मुंबईत उद्धव ठाकरे यांना 14 ते 17 जागा मिळू शकतात. भाजपच्या जागा मागच्या वेळी 16 होत्या, त्यात दोन-तीन जागा कमी होतील. शिंदेंच्या मुंबईतील 6 पैकी एखादी जागा निवडून येऊ शकते, ती देखील प्रकाश सुर्वे यांची जिंकून येऊ शकते”, अशी प्रतिक्रिया संदीप आचार्य यांनी दिली आहे.

“मनसे किती मतं खाते, कोणाची मतं खाते हा भाग देखील महत्त्वाचा आहे. वरळीत आदित्य ठाकरे जिंकून येतील. बाळा नांदगावकर



यांच्यापेक्षा अजित चौधरी वरचढ ठरतील. दादर माहीममध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना अशीच लढाई दिसते, महेश सावंत आघाडी घेईल, असं दिसतं. मुंबईमधला कार्यकर्ता उद्धव ठाकरेंसोबतच आहे. मुंबईत 5 ते 7 जागा काँग्रेसच्या येऊ शकतात”, असं संदीप आचार्य म्हणाले.

“मुंबईवरती महाविकास आघाडीचे वर्चस्व दिसेल. बाबा सिद्धीकींची हत्या झाली होती. त्याची झिशानला सहानुभूती मिळू शकते. मात्र वरूण सरदेसाई पहिल्या दिवसापासून तेथे काम करतोय, जिंकण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांना राज ठाकरेंनी गद्दार शब्द वापरला. मनसे भाजपची लाईन वापरत आहे का? असा प्रश्न पडेल”, अशी प्रतिक्रिया संदीप आचार्य म्हणाले.

“ठाण्यामध्ये एकनाथ शिंदे यांचे वर्चस्व, ते स्वतः भरघोस मतांनी निवडून येतील. प्रताप सरनाईक देखील येत आहेत. ठाणे शहरामध्ये काँटे की टक्कर होईल. अविनाश जाधव यांनी वातावरण तयार केलं. राजन विचारे कुठेतरी मागे आहेत. लोकसभेला संविधान बदलणाऱ्याचा आरोप करणाऱ्यांना जास्तीत जास्त मतदान झालं. त्यात महाविकास आघाडीला मतदान मिळून झालंय. आता वाढलेलं मतदान हे नव मतदार किंवा लाडक्या बहिणीचं, यात मेजॉरिटी महायुतीकडे जाईल”, असा दावा संदीप आचार्य यांनी केला.

ज्येष्ठ पत्रकार राम तरटे यांनी नांदेड जिल्ह्यातील मतदारसंघांबाबत प्रतिक्रिया दिली आहे. “नांदेड जिल्ह्यात महायुतीला 5 आणि महाविकास आघाडीला 4 जागा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. देगलूर, मुखेड, किनवट आणि नांदेड उत्तर महाविकास आघाडीला मिळतील. या वेळेस जरांगे फॅक्टरचा 50 टक्के फरक पडेल. वंचित बहुजन आघाडीला फार जास्त चालल्याचे दिसून आले नाही. हिंदू-मुस्लिम असं मतांचे ध्रुवीकरण झालं. नांदेड जिल्ह्यात मुखेडला अपक्ष उमेदवार बालाजी खतगावकर होते. नांदेड उत्तर मध्ये महाविकास आघाडीचे दोन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात सोडता याचा मैत्रीपूर्ण लढतेचा अर्थ लोकांनाही कळाला नाही”, अशी प्रतिक्रिया राम तरटे यांनी दिली.

“नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पार्टीने नवीन चेहरा वापरला. तो करेक्ट वापरला. संतुक हंबर्डे यांच्या उमेदवारीबाबत शंका घेण्याची गरज नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत असल्यामुळे विकासाचा मुद्दा घेऊन भारतीय जनता पार्टी प्रचार करताना दिसली. दुसरीकडे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र चव्हाण यांना वडिलांच्या निधनाची सहानुभूती मोठ्या प्रमाणात दिसली. नायगावमध्ये क्रॉस व्होटिंग झाली. मुखेडमध्ये क्रॉस व्होटिंग झाली. भोकरमध्ये क्रॉस व्होटिंग झाली. भोकरमध्ये क्रॉस व्होटिंग झाली.

# ‘भाजपला मतदान करा नाही तर बघून घेतो’

## सुनील कांबळेंविरुद्ध पोलिसांकडे तक्रार अर्ज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मतदानाला जात असताना भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुनील कांबळे आणि त्यांच्या समर्थकांनी आम्हाला शिवीगाळ करून मारहाण केली. भाजपला मतदान करा, नाहीतर तुम्हाला बघून घेतो, अशी धमकी दिल्याचा आरोप भवानी पेठेतील कासेवाडी भागातील मतदारांनी केला आहे. याबाबत कासेवाडीतील रहिवासी सुरेखा राजू खंडाळे यांनी खडक पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे. कांबळे आणि समर्थकांविरुद्ध



गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

सुरेखा खंडाळे, मीरा हेमंत बिघे, पारू दहातोंडे, जायदा शेख या बुधवारी (20 नोव्हेंबर) दुपारी पावणेएकच्या सुमारास गोल्डन ज्युबली एज्युकेशन ट्रस्ट येथील मतदान केंद्रात मतदानाला निघाल्या होत्या.

त्यावेळी भाजप उमेदवार सुनील कांबळे, तुषार तानाजी पाटील, तनवीर तानजी पाटील, अरविंद जाधव, आकाश अविनाश पाटोळे, सनी अडागळे यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी आम्हाला धक्काबुक्की केली.

अश्लील वर्तन केले. आमच्याविरुद्ध तक्रार केल्यास त्यांनी जिवे मारण्याची धमकी दिली. मी स्थानिक आमदार आहे, राज्यात आमचाच गृहमंत्री आहे, अशी धमकी सुनील कांबळे यांनी दिली, असा आरोप खंडाळे यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रार अर्जात केला आहे.







# मतदान उरकले, प्रशांत जगताप देवदर्शनाला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बुधवारी (20 नोव्हेंबर) महाराष्ट्रातील 288 जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान पार पडले. त्याआधी महिनाभर सर्व पक्षांचे उमेदवार प्रचारात व्यस्त होते. मतदानानंतर दुसऱ्या दिवशी काही उमेदवार आपले कुटुंब, मित्रांसोबत वेळ घालावताना दिसत आहे. येत्या 23 तारखेला मतमोजणी होवून निकाल लागणार आहे. हडपसर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रशांत जगताप यांनी मतदान पार पडल्यावर दुसऱ्या दिवशी (गुरूवारी) कुटुंबासमवेत वेळ घालवला. तसेच त्यांनी सपत्नीक आध्यात्मिक गुरुंचे दर्शन घेऊन देवदर्शन केले.

प्रशांत जगताप म्हणाले की, गेल्या जवळपास महिनाभरापासून विधानसभा निवडणुकीची धावपळ सुरू होती. स्वत: उमेदवार असल्याने ही धावपळ अधिक वाढलेली होती. या संपूर्ण कालावधीत कुटुंबाला वेळ देता येणं शक्यच नव्हतं. उलट कुटुंब रंगलंय प्रचारात... अशीच माझ्या कुटुंबाची अवस्था होती. त्यामुळं, जे काही बोलणं, भेटणं व्हायचं त्यात राजकीय चर्चा, प्रचाराची स्थिती, आज



प्रचारासाठी आणि गाठीभेटींसाठी कोण कुठं जाणार आहे, हाच मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी असायचा. आई, वडील, भाऊ, वहिनी, मुलगा, पुतणे, नातेवाईक, सहकारी, मित्र परिवार, कार्यकर्ते अशा सर्वांनीच प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतलेली होती. माझी पत्नी अमृता तर खांद्याला खांदा लावून लढत होती. प्रसंगी माझ्या पुढे दोन पावले जाऊन तिने प्रचार केला. माझे कुटुंबीय तर प्रचारात होतेच, पण तुमच्या सर्वांशिवाय हा प्रचार अपूर्ण होता. तुम्ही सर्वांनीही खूप कष्ट घेतले. त्यामुळे, दिवसेंदिवस आपल्या सर्वांचाच विश्वास वाढत जात होता.

जगताप पुढे म्हणाले की, अखेर बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली आणि हडपसर विधानसभा मतदारसंघाचा पुढचा आमदार कोण असेल, याचा फैसला मतपेटीत बंद झाला. बुधवारी दिवसभर मतदारसंघातील बूथवर भेट देऊन आढावा घेत होतो. रात्री उशिरापर्यंत अनेकांचे फोन सुरू होते. त्या प्रत्येकांशी संवाद साधत होतो. मला भक्कम साथ दिल्याबद्दल आभार व्यक्त करीत होतो. आता शनिवारी निवडणुकीचा निकाल जाहीर होईल. त्यात आपला विजय होईल, हा विश्वास आहे. त्यानंतर पुन्हा एकदा आपण सर्वचजण राजकीय जबाबदाऱ्यांमध्ये व्यग्र असू. त्यामुळे, काल असंच ठरवलं होतं की गुरूवारचा दिवस कुटुंबासाठी आणि स्वत:साठी द्यायचा. लाँग ड्राइव्हवर निघायचं. अध्यात्मिक दर्शन, प्रवास, निसर्ग पर्यटन यातून मला नेहमीच एक नवी ऊर्जा मिळत असते. त्यामुळं, गुरुवारी सकाळीच पत्नी अमृतासमवेत माझ्या आवडीचं ठिकाण असलेल्या सोलापूर जिल्ह्यात दाखल झालो. खरं तर अमृताला हे नियोजन अचानक कळाल्यानं तिच्यासाठी हा एक सुखद धक्काच होता.

अध्यात्मिक गुरुंचं दर्शन घेतलं. देवदर्शन घेतलं. प्रवासाचा आणि निसर्ग पर्यटनाचा आनंद घेतला. सोलापुरात मिसळीचा आस्वाद घेतला. प्रवासानं, अध्यात्मिक, देवदर्शनानं जसं आत्मिक समाधान मिळालं, तसंच मिसळीचा मनमुराद आनंद घेऊन चवीचंही समाधान मिळाल्याचं जगताप यांनी सांगितले.

खरं सांगायचं तर पर्यटन, अध्यात्मिक गुरुंचा सहवास आणि देवदर्शन हा माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळं, शक्य तेव्हा आणि वेळ काढून कुटुंबासमवेत प्रवास करत राहतो. माझ्या मित्र – परिवाराला व पक्षासाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांनाही मी हे आवर्जून सांगत असतो की वेळ मिळेल तेव्हा किंबहुना ठरवून कुटुंबासमवेत प्रवासाचा, पर्यटनाचा आनंद घ्या. यातून एक वेगळ्याच प्रकारची ऊर्जा मिळते.

मन अगदी रिफ्रेश होतं. नव्या आव्हानांना तोंड देता येतं. ही ऊर्जा, ही उमेद, हे समाधानच आपल्याला सकारात्मक जगण्याचं बळ देत राहतं. हीच ऊर्जा घेऊन पुन्हा एकदा नव्या जोमाने आपल्या सेवेसाठी हजर झालो आहे, असे जगताप म्हणाले.






# ...तर पृथ्वी 'आयसीयू'मध्ये जाईल!



अझरबैजान येथे सुरू असलेल्या जागतिक हवामान परिषदेमध्ये पृथ्वीचे तापमान कमी करण्यासाठी काही निर्णय घेतले जातील, मात्र त्यांचे पालन करण्यासाठी मोठ्या देशांना आणि कंपन्यांना कायद्याने कुठलीच बांधिलकी नाही. त्यांच्या स्वयंप्रज्ञेने ते जो काही निधी देतील, कार्यवाही करतील त्यावर अविकसित देशांना भरपाई मिळून पुढील कामकाज चालेल. त्यामुळे पर्यावरण रक्षण आणि हवामान बदल हा जगभरातील नागरिकांनी आपल्या जिव्हाळ्याचा विषय केला नाही तर वसुंधरेसोबत सर्व मानवजातीला 'आयसीयू'मध्ये भरती व्हावे लागेल! कार्बनच्या बेसुमार उत्सर्जनामुळे पृथ्वीवरील तापमान वाढ आणि हवामान बदलाचा होणारा परिणाम यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी मध्य आशियातील अझरबैजान येथे 11 नोव्हेंबरपासून जागतिक हवामान परिषद 'सीओपी 29' सुरू झाली आहे. यासंदर्भातील वृत्त बघताना खरे तर पृथ्वीची तापमान वाढ हा विषय जगभरातील सर्व राष्ट्रांचा प्राधान्य क्रमांकावर आणि नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय असायला हवा, परंतु यासंदर्भातही जगभराची वाटणी मोठ्या प्रमाणावर कार्बन उत्सर्जन करून पृथ्वीच्या तापमानवाढीला हातभार लावणारे श्रीमंत देश विरुद्ध तिसऱ्या आणि चौथ्या जगातील आशिया, आफ्रिकेमधील गरीब देश अशी झालेली मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.

उद्या पृथ्वीच्या तापमानवाढीमुळे, हवामान बदलामुळे जगभरावर ज्या काही नैसर्गिक आपत्ती, संकटे ओढवतील त्यामध्ये निसर्ग काही श्रीमंत-विकसित देश आणि अविकसित देश अशी विभागणी करणार नाही किंवा त्याची किंमत फक्त अविकसित आणि अर्धविकसित देशांनाच मोजावी लागणार असे नाही. आज युरोप, अमेरिका आणि मध्य आशिया हवामान बदलामुळे वर्षभरामध्ये होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींना मोठ्या प्रमाणात सामोरे जात आहेत. वारंवार नद्यांना येणारे पूर, चक्रीवादळे, जंगलांना लागणाऱ्या आगी, अतिउष्णतेमुळे पिकांचे होणार नुकसान, कमी वेळात जास्तीचा पडणारा पाऊस, अवकाळी पाऊस, शिवाय समुद्राचे वाढलेले तापमान. त्यामुळे पाण्याची वाफ होऊन हवेमध्ये निर्माण झालेले अधिकचे बाष्प. त्यामुळे होणारी ढगफुटी, जिवाला मुकणारे हजारो नागरिक, काही लाख हेक्टरवरील पिकांची हानी आणि या सर्वांमध्ये कोट्यावधी रुपयांचे होणारे नुकसान.

विकासाच्या आणि पायाभूत सोयीसुविधांच्या नावाखाली आज जगभरामध्ये आणि भारतामध्येही नागरीकरणाचे नीतिनियम न पळता शहरांची अनियमित अशी वाढ होत आहे. खरं तर अशी शहरे वाढताना योग्य अशा नगर नियोजनाचा, तज्ञांचा सल्ला घेणे जरूरी आहे, पण केवळ उंच उंच इमारती बांधणे आणि काँक्रीटचे रस्ते तयार करणे यालाच आज नगर विकास म्हटले जात आहे. या नगरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना आपण कुठले राहणीमान देत आहोत? येण्याजाण्यासाठी चांगले प्रशस्त रस्ते, वीज, स्वच्छ पाणी, मोकळी हवा, आजूबाजूला पसरलेली हिरवळ, वनस्पती असे देत आहोत का? पर्यावरणपूरक राहणीमान देण्याऐवजी केवळ मोठमोठी निवासी संकुले उभी केली जात आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणानुसार जगातील सर्वात प्रदूषित शहरांच्या यादीमध्ये भारतातील जवळपास 35 शहरे आहेत. त्यात आपल्या देशाची राजधानी दिल्लीचा पहिल्या पाचांत समावेश आणि हवेची गुणवत्ता दाखवणारा AQI साडेतीनशेच्या वर गेलेला आहे. वेगवेगळ्या आजारांनी आणि शारीरिक व्याधींनी राजधानीतील नागरिक त्रस्त आहेत. सातत्याने होणारे भूस्खलन, त्यामध्ये होणारी मोठ्या प्रमाणावर जीवितहानी, वित्तहानी, पर्यावरणाचे नुकसान आणि या सर्वांसाठी दोन-पाच लाखांची दिलेली मदत अशी थातूरमातूर मलमपट्टी करून वेळ मारून नेली जाते. निसर्ग सौंदर्यामध्ये भर घालणाऱ्या खळखळून वाहणाऱ्या नद्यांचे आम्ही मोठ्या प्रमाणात प्रदूषण करून त्यांचे दुर्गंधीयुक्त ओढे आणि नाले करून टाकले आहेत. शासन आणि प्रशासनाला, त्यासोबत नागरिकांनाही या कशाची तमा नाही.

जगाच्या लोकसंख्येने आताच आठ अब्ज आकडा पार केलेला आहे आणि येणाऱ्या काही वर्षांमध्ये हा आकडा नऊ अब्जाच्या पलीकडे जाईल. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला मोकळी हवा, प्यायला स्वच्छ पाणी आणि पोट भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य मिळण्यासाठी शेतमालाच्या उत्पादनामध्ये प्रचंड वाढ करावी लागेल, परंतु जागतिक संस्थेने दिलेल्या इशाऱ्यानुसार ग्लोबल वाॅर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान सतत वाढत असल्यामुळे शेतमालाच्या उत्पादनावर अतिशय प्रतिकूल परिणाम होऊन अन्नधान्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर निर्माण होण्याची शक्यता आहे.

अमेरिकेत निवडून आलेल्या नवीन अध्यक्षांना तर ग्लोबल वाॅर्मिंग असे काही असते हेच मुळी मान्य नाही. त्यामुळे यापुढे अमेरिकेचा आणि अमेरिकेपाठी धावणाऱ्या इतर युरोपीय राष्ट्रांचा ग्लोबल वाॅर्मिंगसंदर्भात दृष्टिकोन काय असेल हे समजून येते. अझरबैजान येथील सध्या सुरू असलेल्या जागतिक हवामान परिषदेला प्रदूषण करणाऱ्या प्रमुख 13 देशांनीच गैरहजर राहणे म्हणजे परिषदेला उधळून लावण्यासारखेच आहे, याच विकसित देशांतील मोठ्या 20 कोळसा आणि तेल उत्पादन करणाऱ्या कंपन्यांचा संपूर्ण जगाच्या खनिज ऊर्जेच्या पुरवठा साखळीवर ताबा आहे आणि जगातील एकूण प्रदूषणापैकी 40 टक्के वाटा हा याच कंपन्यांचा आहे.

मागील परिषदेमध्ये अपारंपरिक ऊर्जा निर्मिती 2030 पर्यंत 11 टेरावॅटपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठरवले होते, परंतु काही वर्षांमध्ये जगभरात फक्त 4 ते 5 टेरावॅट अक्षय्य ऊर्जा निर्मितीपर्यंत मारणे म्हणजे परिषदेच्या उद्दिष्टांना काळे फासण्यासारखे आहे.

जगभरातील नागरिकांमध्येही जागतिक हवामान बदलासंदर्भात खूप मोठ्या प्रमाणावर जाणीव निर्माण झाल्याचे दिसत नाही. युरोपमधील काही देश सोडले तरी तर सर्व राष्ट्रांमध्ये आनंदी आनंदच आहे. अगदी भारतामध्ये बघितले तर वेगळी स्थिती नाही. अझरबैजान येथे सुरू असलेल्या जागतिक हवामान परिषदेमध्ये पृथ्वीचे तापमान कमी करण्यासाठी काही निर्णय घेतले जातील, मात्र जगाला प्रदूषित करणाऱ्या आणि मोठ्या प्रमाणावर कर्ब उत्सर्जन करणाऱ्या मोठ्या देशांना आणि कंपन्यांना ते पाळण्यासाठी कायद्याने कुठलीच बांधीलकी नाही. त्यांच्या स्वयंप्रज्ञेने ते जो काही निधी देतील, कार्यवाही करतील त्यावर अविकसित देशांना भरपाई मिळून पुढील कामकाज चालेल. त्यामुळे पर्यावरण रक्षण आणि हवामान बदल हा जगभरातील नागरिकांनी आपल्या जिव्हाळ्याचा आणि जीवनशैलीचा विषय केला तरच भविष्यात सृष्टीचा टिकाव लागेल, नाहीतर या वसुंधरेसोबत सर्व मानवजातीला 'आयसीयू'मध्ये भरती व्हावे लागेल!

# आर्ट-नोव्हेंबर समुह कला प्रदर्शनाचे आयोजन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
रोमार्टिका आर्ट डिकोडेडने कोरेगाव पार्क, पुणे येथील मालाका आर्ट गॅलरीमध्ये आर्ट-नोव्हेंबर ग्रुप शोचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. चित्रकला प्रदर्शनाची सुरुवात अनेक सनसनाटी कार्यक्रमांनी झाली. 'आर्ट इज अ जेलस मिस्ट्रेस' या विषयावर पॅनेल चर्चेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये पुणे आर्ट मूव्हमेंटचे संस्थापक श्री. अनुब जॉर्ज, मानसशास्त्रज्ञ डॉ. सुप्रिया ढोंगडे, आयएसआयचे प्राध्यापक डॉ. अमित बिस्वास आणि लेखक सैकत बक्सी हे पॅनेल सदस्य होते. प्रख्यात कलाकार शरद तर्डे आणि सुचिता तर्डे यांनी श्रोत्यांना अमूर्त अभिव्यक्तीच्या विविध पैलूंविषयी मार्गदर्शन केले. डॉ. अमित बिस्वास यांनी कला आणि गणित यांच्यातील संबंधांवर भाष्य केले. कलाकार सरन्या गांगुली यांनी लाइव्ह म्युझिकसह चित्रकला सादर केली.

शोचे उद्घाटन डॉ. अमित बिस्वास, विनायक भोरकडे - गोडरेज प्रॉपर्टीजचे मार्केटिंग प्रमुख आणि अबीरा आर्ट्सच्या संस्थापक स्वेता सिंग यांच्या हस्ते 16 नोव्हेंबरच्या संध्याकाळी मोठ्या उत्साहात करण्यात आले. हे प्रदर्शन 30 नोव्हेंबर 2024 पर्यंत पंधरा दिवसांसाठी खुले राहील.

सात कलाकारांनी त्यांच्या अनोख्या शैली आणि आत्म्याचे प्रदर्शन केले. गौरांगी मेहता शाह यांच्या अभिव्यक्तिवादी मानवी आकृती गूढ आणि सणासुदीच्या वातावरणात आहेत. पौलमी जगताप यांच्या अमूर्त अभिव्यक्ती भावनिक भोवऱ्याच्या फिरत्या स्ट्रोक्स आहेत. गितांजली सेनगुप्ता यांच्या शांत लँडस्केप्स शांतता आणि शांततेच्या जगाची खिडकी उघडतात. मानसी सुरेका यांच्या मंडलांमध्ये तेजस्वी, विरोधाभासी ठिपक्यांसह गूढ लक्ष केंद्रित केले आहे जे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतात. सुरमई मोगोडे यांच्या कॅनव्हासमध्ये अमूर्तता आणि भारतीय शास्त्रीय आत्म्याचे मिश्रण आहे. निकिता गर्ग यांच्या स्वच्छ लँडस्केप्समध्ये एक अद्भुत पारदर्शक आकर्षण आहे आणि अपराजिता अंबस्थ यांच्या विविध चित्रांमध्ये उज्ज्वल भविष्याचे आश्वासन आहे.

हे प्रदर्शन कला प्रेमींसाठी एक अद्भुत दृश्य मेजवानी आहे.

## विन्सिस आयटी सर्व्हिसेसच्या करोत्तर नफ्यात 36.4% वाढ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे येथे मुख्यालय असलेल्या विन्सिस आयटी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड, या जागतिक आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा व प्रशिक्षण क्षेत्रातील कंपनीने 30 सप्टेंबर,2024 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2025च्या पहिल्या सहामाहीचे आर्थिक निकाल नुकतेच जाहीर केले. आर्थिक वर्ष 2025च्या पहिल्या सहामाहीत कंपनीच्या एकत्रित एकूण महसुलात 16.3% वाढ होऊन तो ₹92.11 कोटींवर पोहोचला आहे, जो आर्थिक वर्ष 2024च्या पहिल्या सहामाहीत ₹79.23 कोटी होता. आर्थिक वर्ष 2025च्या पहिल्या सहामाहीत कंपनीच्या एकूण उलाढालीपैकी सुमारे 38% व्यवसाय परदेशी बाजारापेठेतून आला आहे. कंपनीच्या ईबीआयटीडीएमध्ये 53.04% वाढ होऊन तो 2025च्या पहिल्या सहामाहीत ₹15.35 कोटी झाला आहे, जो आर्थिक वर्ष 2024च्या पहिल्या सहामाहीत ₹10.03 कोटी इतका होता. 2024च्या पहिल्या सहामाहीच्या तुलनेत 2025च्या पहिल्या सहामाहीत ईबीआयटीडीए मार्जिन 420 बेसिस पॉइंट्सने वाढून 16.6% झाला आहे, तर करोत्तर नफ्याचे मार्जिन 180 बेसिस पॉइंट्सने वाढून 11.9% झाले आहे. आर्थिक वर्ष 2025च्या पहिल्या सहामाहीतील महसूल, आर्थिक वर्ष 2024मध्ये नोंदवलेल्या एकूण महसुलाच्या 54% नोंदविण्यात आला, तर ईबीआयटीडीए 51.08% होता. वित्तीय कार्यक्षमतेत सुधारणा आणि व्यवसायवाढ यामुळे ही किरकोळ वाढ दिसून आली.

# सारा अली खानने आयोजित केलं योगा रिट्रीट




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
बॉलिवूड अभिनेत्री, फिटनेस आणि प्रवासाची आवड असलेली सारा अली खान प्रथमच गोव्यातील शांत आणि निसर्गरम्य एअरबीएनबी मध्ये एका गटासाठी खास वेलनेस आणि योगा रिट्रीट आयोजित करणार आहेत. बुकिंगसाठी 27 नोव्हेंबर रोजी सकाळी 10 वाजता सुरू होतील. हे तीन दिवस आणि दोन दिवसांचे रिट्रीट ₹0 मध्ये उपलब्ध असेल. पाहुण्यांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर होईल, आणि प्रत्येक पाहुण्याला आणखी तीन लोकांना सोबत घेऊन येण्याची परवानगी असेल. हिरवळीने नटलेल्या गोव्याच्या निसर्गसंपन्न प्रदेशात आयोजित होणारं हे आदर्श विश्रांतीचं एक आदर्श ठिकाण ठरणार आहे. त्यामुळे संपूर्ण आरोग्य जपण्यासाठी आणि मन:शांती मिळवण्यासाठी एक उत्तम संधी निर्माण होणार आहे. फिटनेसप्रती असलेली निष्ठा आणि सिनेमासृष्टीतील करिअर यांचा उत्तम समतोल राखणारी सारा आता तिच्या वेलनेस आणि योगाप्रती असलेल्या आवडीला गोव्यातील एअर बीएनबीवर घेऊन येत आहे. या रिट्रीटमध्ये पाहुण्यांना सारा बरोबर सुंदर निसर्गरम्य ठिकाणी योगाभ्यास करण्याची संधी मिळणार आहे, तसेच तिच्या वैयक्तिक वेलनेस रूटीन आणि रहस्यांची माहिती घेण्याची संधीही मिळेल. साराबरोबर एक मिट अँड ग्रीट ची संधी मिळणार आहे. "गोव्यातील एअर बीएनबीवर असेलल्या या खास वेलनेस आणि योगा रिट्रीटसाठी पाहुण्यांचं स्वागत करण्यास मी अतिशय उत्सुक आहे,. निसर्गसौंदर्याने भारलेल्या या ठिकाणी, आपण मन, शरीर आणि आत्म्याचं पोषण करण्यावर लक्ष केंद्रित करणार असून काही अविस्मरणीय आठवणींना आकार देणार आहोत. विसाव्याचे, नव्याने जोडले जाण्याचे आणि जीवनातील साध्या क्षणांचा आनंद घेण्याची ही एक मौल्यवान संधी आहे," असे सारा अली खान म्हणाली.


एअरबीएनबीने 2022 मध्ये गोवा पर्यटन विभागासोबत एक सामंजस्य करार केला. गोव्याच्या शांत भागांचे आणि त्याच्या अनोख्या होमस्टे इकोसिस्टमचे प्रमोशन करण्यावर या करारात भर दिला गेला होता. या कराराद्वारे गोव्याचे सौंदर्य केवळ समुद्रकिनाऱ्यांपलीकडे नेण्याचे राज्य सरकारचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास एअरबीएनबी पूर्ण सहकार्य करत आहे.

# खेड तालुक्यात मतदान शांततेत



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
राजगुरुनगर येथील खेड-आळंदी विधानसभा मतदार संघातील 389 मतदान केंद्रांवर विधानसभा निवडणुकीसाठी शांततेत मतदान झाले. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामिण मतदारांमध्ये मतदारांमध्ये उत्साही वातावरण दिसत होते. तालुक्यात साधारणपणे पाच वाजेपर्यंत 61.57 टक्के मतदान झाले. मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. खेड तालुक्यातील अनेक मतदानकेंद्रांना उमेदवार आमदार दिलीप मोहिते पाटील व इतर उमेदवारांनी भेट दिली. पोलीस व इतर प्रशासकीय यंत्रणा यांनी मतदारांना सहकार्य केले. दुपारी तीन वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी कमी होती. तर चार नंतर मतदानाचे प्रमाण काहीसे वाढले. नागरीकांनी रांगा लावून मतदानाचा हक्क बजावला. सेल्फी पॉईंटवर अनेक उत्साही नागरीकांनी आपले सेल्फी छायाचित्र घेतले. तर काही नागरीकांनी उमेदवारांसह सेल्फी छायाचित्र घेतले. खेडमधील 389 मतदान केंद्रापैकी 195 केंद्रांवर वेब कास्टिंग करण्यात आले. राजगुरुनगर येथील महात्मा गांधी विद्यालयातील मतदान केंद्र क्रमांक 151 येथे पिंक मतदान केंद्र, धुओली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मतदान केंद्र क्रमांक 6 येथे युनिक मतदान केंद्र, होलेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील मतदान केंद्र क्रमांक 207 येथे दिव्यांग मतदान केंद्र उभारण्यात आले होते. चाकण येथील मुलींची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील मतदान केंद्र क्रमांक 289 येथे युवा व्यवस्थापित मतदान केंद्र, वाकी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मतदान केंद्र क्रमांक 230 येथे मॉडेल मतदान केंद्र, राजगुरुनगर येथील मुलींची जिल्हा परिषद शाळा मतदान केंद्र क्रमांक 239 येथे पर्दानशीन मतदान केंद्र करण्यात आले. खेडमध्ये एकही संवेदनशील व प्रादेशिक मतदान केंद्र नाही, अशी माहिती निवडणूक अधिकारी अनिल दौंडे यांनी दिली.

## थोडक्यात



### खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात 68 टक्के मतदान

- मागील निवडणूकीपेक्षा मतदानात केवळ एक टक्का वाढ

**राजगुरुनगर (आरंभ पर्व) :** राजगुरुनगर येथील खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात एकूण मतदार 3 लाख 76 हजार 623 मतदार आहेत. त्यापैकी दोन लाख 58 हजार 212 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. झालेले एकुण मतदान 68.56 टक्के आहे. मागील 2019 च्या निवडणूकीत 67.38 टक्के इतके मतदान झाले होते. यावेळी 1 लाख 38 हजार 146 पुरूषांनी तर 1लाख 20 हजार 62 महीलांनी तसेच इतर 4 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुरूषांचे एकुण मतदान 71.31 टक्के तर महीलांचे 65.62 टक्के मतदान झाले. याबाबतची अधिकृत आकडेवाडी गुरूवारी (दि. 21) घोषीत करण्यात आली. गुरूवारी पहाटे दोन वाजेपर्यंत मतपेट्या जमा करणे व इतर प्रक्रीया पुर्ण करण्यात आली.

### विद्यार्थी साहाय्यक समितीतर्फे शुक्रवारी (ता. 22) 'गीतरामायण'




**पुणे (आरंभ पर्व) :** विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने ग. दि. माडगूळकर विरचित, संगीतकार सुधीर फडके यांच्या गीतरामायण कार्यक्रमाचे सादरीकरण प्रख्यात गायक श्रीधर फडके करणार आहेत. येत्या शुक्रवारी, दि. 22 नोव्हेंबर 2024 रोजी सायंकाळी 5 ते 8.30 या वेळेत टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे हा सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. सहाय्यदाते, हितचिंतक, स्नेहीजणांसाठी दरवर्षी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने गायनाचा कार्यक्रम आयोजिला जातो. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. मात्र, नियोजनाच्या दृष्टीकोनातून प्रवेशिका घ्याव्यात. या प्रवेशिका समितीच्या कार्यालियातून गुरुवारी (दि. 21 नोव्हेंबर) सायंकाळी 6 वाजेपर्यंत उपलब्ध असणार आहेत, असे समितीतर्फे कळविण्यात आले आहे.

### उरुळी कांचनमध्ये गुरुनानक जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**उरुळी कांचन (आरंभ पर्व)** : उरुळी कांचन येथे गुरुनानक जयंती मोठ्या उत्साहात सिंधी पंचायत व उत्सव समितीच्या पुढाकाराने साजरी करण्यात आली. या उत्सवात सिंधी बांधव व महिला अवाल वृद्ध मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सिंधी बांधवांनी आपली दुकाने बंद ठेवून संपूर्ण दिवस उत्सवात सहभागी झाली. तसेच परिसरातील सिंधी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी गुरुनानक देवाची भव्य मिरवणुक काढण्यात आली. पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संध्याकाळी महाप्रसादचे आयोजन करण्यात केले होते. मिरवणुकीत उरुळी कांचन मधील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध क्षेत्रात कार्यरत असणारे आजी माजी पदाधिकारी यांनी हजेरी लावली होती.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुयरेश वांजळे यांनी केले मतदान.



भाजपा महायुतीचे उमेदवार भिमराव तापकीर यांना कुटुंबासह मतदान केले. यावेळी सर्वांनी मतदान करावे असे आवाहन केले. खडकवासल्यात जनता आपल्या सोबत आहे. 23च्या निकालात नक्की दिसेल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




सचिन दोडके यांनी केले मतदान

# लेनोवोकडून टॅबलेट आणि लॅपटॉप पोर्टफोलिओ विस्तार

**भारत (दै. आरंभ पर्व)**

लेनोवो जागतिक तंत्रज्ञान पॉवरहाऊसने भारतात लेनोवो टॅबलेट K 11 (वर्धित आवृत्ती) म्हणून लॉन्च केल्याची आज घोषणा केली. एंटरप्राइजेस आणि व्यावसायिकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी लेनोवो ने हा अत्याधुनिक पोर्टपोलिओ खास डिझाइन केला आहे. लेनोवो ने या नव्या पोर्टपोलिओतून व्यावसायिकांना परवडणाऱ्या दरांत उच्च कार्यक्षमता,सुरक्षितता,व्यवस्था पन आणि टिकाऊपणा यांचा उत्तम संयोग साकारला आहे. याची माहिती देताना लेनोवो इंडियाचे संचालक आणि श्रेणी प्रमुख आशिष सिक्का म्हणाले, "वापरकर्त्यांच्या मागण्या लक्षात घेऊन, K11 (वर्धित आवृत्ती) टॅबलेट वर्तमानील उद्योग आणि व्यावसायिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केला आहे. उच्च दर्जाची कार्यप्रणाली, टिकाऊपणा यांचे अभूतपूर्व मिश्रण असलेला हा टॅबलेट एकाच वेळी उच्च व्यवस्थापनाची सुविधा देतो. आकर्षक डिस्प्ले, उच्च कार्यक्षम प्रोसेसरने सज्ज असलेला हा टॅबलेट व्यवसायिक आणि कर्मचाऱ्यांसाठी अष्टपैलू आदर्श पर्याय आहे. 11-इंचाचा एल. सी. डी डिस्प्ले असलेला हा टॅबलेट 400 nits ब्राइटनेस आणि 1920 x 1200 रिझोल्यूशनचा पर्याय वापरकर्त्याला प्रदान करतो. वर्धित क्वाड स्पीकर इमर्सिव्ह ध्वनी सुविधेसह डॉल्बी ॲटोमस मल्टीमीडिया आणि व्यावसायिक वापरासाठी आदर्श आहे. मिडिया टेक हेलिओ जी. 88 (MediaTek Helio G88) प्रोसेसरने सुसज्ज या टॅबलेटमधील क्षमता 8GB RAM पर्यंत आणि 128 GB पर्यंत आहे. सोबतच त्याची स्टोरेज क्षमता 1TB पर्यंत वाढवता येण्याजोगी देखील आहे. स्मूथ मल्टीटास्किंग आणि भरपूर स्टोरेज सुविधाही असलेला हा टॅबलेट वजनाने फक्त 496g इतका हलका आहे. 7.15mm पातळ, वायफाय, ब्लू टूथ 5.1 एल. टी. ई (WiFi, Bluetooth® 5.1, LTE) सह तो लवकर चार्ज होणाऱ्या 7040 mAh बॅटरीनेही सुसज्ज आहे. जो व्यावसायिकांसाठी उत्तम प्रवासी सहकारी ठरणार आहे. Lenovo Tab K11 (वर्धित आवृत्ती) 22,999 INR किमतीसह Luna ग्रे रंगात उपलब्ध आहे. हा टॅबलेट lenovo.com वर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सक्षम पोर्टफोलिओला जोडून लेनोवो ने भारतात थिंक बूक 13 X G4 (ThinkBook 13X G4) देखील लॉंच करण्याची घोषणा केली. नव्या संकल्पनांची आवड असलेल्या व्यावसायिकांच्या मागणीची पूर्तता करण्याचे लेनोवो ने हे पाऊल उचलले आहे. पॉवर आणि पोर्टेबिलिटीसाठी लेनोवो ने खास या ThinkBook 13X G4 ची रचना केली आहे. ज्यात अखंड मल्टीटास्किंगची क्षमता आहे. फक्त 1160 ग्रॅम आणि 12.9 मिमी पातळ असलेला हा पोर्टेबल थिंकबूक शक्तिशाली आहे. डोळ्यांवर ताण येऊ नये यासाठी कमी निळ्या प्रकाशासह रेनलॅंडने प्रमाणित करण्यात आलेले TÜV - 13.5-इंच 3:2 डिस्प्ले हे त्याचे आणखी एक वैशिष्य आहे.


MIL-STD-810-H ग्रेड चाचणी सहनशीलता आणि 60 cc स्पिल-प्रतिरोधक कीबोर्डसह विश्वास निर्माण करण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे. कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांसाठी हा थिंकबूक 13X G4 (ThinkBook 13X G4) एक वर्षाच्या बेस वॉरंटीसह आदर्श निवड ठरणार आहे. प्रीमियम पोर्टेबिलिटीचा शोध घेणाऱ्या वापरकर्त्यांसाठी उच्च कार्यक्षमता आणि सुरक्षा प्रदान करणारा हा ThinkBook 13X G4 Lenovo.com वर INR 1,14,990 पासून उपलब्ध आहे.




# पुणेकर थंडीने कुडकुडले, आणखी थंडी वाढणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यामध्ये थंडीचा कडाका जाणवू लागला आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये किमान तापमनात चांगलीच घट झाली असून, त्यामुळे पुण्यासह उत्तर महाराष्ट्र आणि संपूर्ण राज्यात गारठा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. पुढील पाच दिवस किमान-कमाल तापमानात आणखी घट होईल, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. पुण्यात आज एनडीएचे किमान तापमान 10 अंशावर नोंदवले गेले. त्यामुळे पुणेकर थंडीने कुडकुडले. तसेच महाबळेश्वरपेक्षाही पुण्याचे तापमान थंड झाले आहे. सध्या अरबी समुद्रातील कोमोरिन आणि लगतच्या भागात समुद्रसपाटीपासून 0.9 किमी ऊंचीवर चक्राकार वाऱ्याची स्थिती आहे. तर केरळपासून दक्षिण पूर्व अरबी



समुद्रातील वाऱ्याची स्थिती समुद्र सपाटीपासून 0.9 किमी वर आहे. देशाच्या उत्तर भागात किमान तापमनात काहीशी घट झाली आहे. देशात बहुतांश ठिकाणी किमान आणि कमाल तापमान 1 ते 2 अंश सेल्सियसने घसरण झाल्याचे पहायला मिळाले. गेल्या 24 तासांमध्ये देशात रिज येथे नीचांकी 8.1 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. तसेच राज्यामध्ये पुण्यातच नीचांकी 12.2 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

# पार्ले ॲग्रोने स्मूध लस्सी केली लॉंच

**राष्ट्रीय (दै. आरंभ पर्व)**

भारतीय पेय मार्केटमध्ये नवसंशोधनास चालना देण्यासाठी प्रसिध्द पार्ले ॲग्रोने स्मूध लस्सी लॉंच केली, त्यांच्या वाढत्या डेअरी उत्पादनांच्या प्रकारांत भारतीय दूध प्रकाराची पुन्हा व्याख्या करण्यास सुसज्ज अशी नवी जोड. लस्सी प्रकारातील सर्वात मोठ्या अशा या उत्तेजक लॉंचला विस्तृत बहु-चॅनल मोहिमेचा पाठिंबा मिळाला व याचा ब्रॅन्ड अंबॅसॅडर वरूण धवन आहे.




स्मूध लस्सीद्वारे, पार्ले ॲग्रोने, लस्सी या पेयास आनंद व मग्नतेच्या अधिक उंचीवर नेऊन ठेवले. दह्याच्या 50% अंशामुळे, ही लस्सी खूपच घट्ट व क्रीमी बनते आणि स्वादिष्ट, आनंददायक व समाधानकारक लस्सीपानाचा आनंद देते. ताजीतवानी व आरामदायक अशी गुलाबाची हलकीशी चव असणारी स्मूध लस्सी अभिजात व पारंपारिक लस्सीची चव देऊ करते झटपट स्नॅक, कौटुंबिक मेळावा, पाहुणचार किंवा नुसतेच ताजे करणाऱ्यासाठी पिक-अप म्हणून, अशा आरामदायक क्षणांसाठी परिपूर्ण असे हे पेय आहे. त्याच्या पॅकेजिंगमुळे स्मूध लस्सी आणखीच एकमेव बनते.

पार्ले ॲग्रो ही अत्त्युत्कृष्ट जंतूविरहित पेट पॅकेजिंगमध्ये 20 रुपयांत 180 मिलिलीटर अशा प्रतिस्पर्धात्मक किंमतीत लस्सी देऊ करणारी राष्ट्रीय स्तरावरील एकमेव कंपनी आहे. याचे नवसंशोधित पॅकेजिंग लस्सी ट्रान्स फॅट्स आणि प्रिझर्व्हेटिव्ह्ज विरहित आहे याची खात्री करते आणि त्या बरोबरच संपूर्ण आणि दर्जेदार सेवनासाठी सहा महिन्याचे शेल्फ लाईफ देऊ करते.

त्याचे चैतन्यपूर्ण आणि आधुनिक डिझाइन नेत्राकर्षक आणि आवडणारे असून त्यामुळे ते गजबजाट असलेल्या मार्केटमध्ये उठून दिसते.

या व्यतिरिक्त, त्याच्या तारुण्यपूर्ण रूप आणि सोयिस्कर आकारामुळे ते ये-जा करताना सेवनासाठी आदर्श ठरते.

पार्ले ॲग्रो त्यांची स्मूध लस्सीची 360 अंश मोहिम, त्यांचा ब्रॅन्ड अंबॅसॅडर वरुण धवनच्या भूमिकेने धडाक्यात सुरु केली. सर्वोच्च लस्सी अनुभवाच्या शोधातील ग्राहक आणि तो अनुभव देणारा दुकानदार अशा धवनच्या दोन्ही भूमिका, या स्मूध लस्सीचा उत्तम दर्जा आणि तोंडाला पाणी आणणारी चव उजेडात आणतात.

> स्मूध लस्सीच्या लॉंचवर वक्तव्य करताना पार्ले ॲग्रोच्या सह-व्यवस्थापकीय संचालिका नादिया चौहान म्हणाल्या, " लस्सी हे भारतीय संस्कृतीत रुजलेले पेय असून त्यात लक्षणीय मार्केट क्षमता आहे. स्मूध लस्सी हे अभिजात पेयाचे आमचे तसेच नवसंशोधित रूप असून आम्ही आधुनिकतेसह परंपरेचा मिलाप करत एक अत्युत्कृष्ट, मलाईदार व समृध्द असे उत्पादन सादर करत आहोत, दर्जा, चव आणि पोषण व आरोग्य मूल्यावर ध्यान केंद्रित करत ग्राहकांच्या अपेक्षा ओलांडण्यासाठी आम्ही स्मूध लस्सी काळजीपूर्वकतेने बनवली आहे.

## थोडक्यात

### भरधाव कंटेनरच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पुणे (आरंभ पर्व) :** भरधाव कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. याप्रकरणी कंटेनर चालकावर हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे. अनिल नामदेव खळदकर (वय 42, रा. कुंभारवळण, पो. खळद, ता. पुरंदर) असे मयत झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणात महादेव मोहन कवटेकर (वय 34, रा. गुंजुटी, ता. उबरगा, जि. धाराशिव, उस्मानाबाद) या कंटेनरचालकाला अटक करण्यात आली आहे. याबाबत राकेश वाघ (वय 34, रा. हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत दुचाकीस्वार अनिल हे हडपसर परिसरातून जात असताना हडपसर-सासवड रस्त्यावरील ग्लायडिंग सेंटर येथे भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरची पाठीमागून जोरदार धडक बसली. या अपघातात ते गंभीर झाल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

# लुई फिलिप यांनी पुण्यात 'रॉयल वेडिंग ट्रेझर्स' कलेक्शन लॉंच केले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लुईस फिलिप या आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेडच्या भारतातील आघाडीच्या प्रीमियम मेन्सवेअर ब्रॅंडने नवीन रॉयल वेडिंग ट्रेझर्स कलेक्शनच्या लॉंचची घोषणा केली आहे. हे कलेक्शन समकालीन स्टाइलचा अवलंब करण्यासोबत परंपरेला सन्मानित करण्याची इच्छा असलेल्या आधुनिक काळातील नवरदेवासाठी डिझाइन करण्यात आले आहे. या कलेक्शनमधून ब्रॅंडचा अपवादात्मक कारागिरी व सुधारित आकर्षकतेप्रती वारसा दिसून येतो, जेथे हे कलेक्शन नवरदेव त्याच्या जीवनातील खास दिवशी आत्मविश्वास व आकर्षकतेसह सर्वांचे लक्ष




वेधून घेण्याची खात्री देते. लुईस फिलिपचे विशेष रॉयल वेडिंग ट्रेझर्स कलेक्शन पारंपारिक विवाह सोहळ्यांची भव्यता व संपन्न संस्कृतीचे प्रतीक आहे, ज्यामध्ये आधुनिक डिझाइन घटकांचा समावेश आहे. प्रत्येक पीस कलाकृती आहे, जे मखमली सारख्या प्रीमियम फॅब्रिक्सपासून कुशलतेने डिझाइन करण्यात आले असून आकर्षक अलंकारांसह सजवण्यात आले आहे. बंधगला गुंतागुंतीचे भरतकाम व सिक्वीन्ससह सुशोभित करण्यात आले असून शाही मोटिफ्समधून प्रेरित आहे, तसेच त्यामधून उच्च दर्जाची कारागिरी दिसून येते, जी नवरदेवाच्या पेहरावाला शाही दर्जा देते. वारसा व समकालीन आकर्षकतेच्या परिपूर्ण संतुलनाचा शोध घेणाऱ्यांसाठी या कलेक्शनमध्ये टू-पीस व थ्री-पीस सूट्स, तसेच सेरेमोनिअल शर्टस् आहेत. या आऊटफिट्समधून ब्रॅंडच्या सर्वोत्तम कौशल्यासह आधुनिक सिल्हूट्स व सर्वोत्तम पोतचे मिश्रण दिसून येते, ज्यामुळे नवरदेव आकर्षकतेसह सर्वांचे लक्ष वेधून घेण्याची खात्री मिळते. कलेक्शनमधील आकर्षक रॉयल ब्ल्यू व रिच ग्रीन्सपासून क्लासिक आयव्हरी व गोल्डपर्यंत कलर पॅलेटमधून वेडिंग फॅशनचे आकर्षक व पारंपारिक पैलू दिसून येतात, ज्यामुळे शाही व कालातील लुक मिळतो. या कलेक्शनबाबत मत व्यक्त करत लुईस फिलिपच्या चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्रीमती फरिदा कलियादान म्हणाल्या, लुईस फिलिपमध्ये आमचा विश्वास आहे की विवाह सोहळ्यांमध्ये वैयक्तिक अभिव्यक्ती सादर केल्या जातात, तसेच परंपरा जपली जाते. हे कलेक्शन त्या भावनेला सन्मानित करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे, तसेच नवरदेवाला आकर्षकता, भव्यता व समकालीन फॅशनचे अद्वितीय फ्यूजन देते.

> या स्पेशल लॉंचला साजरे करण्यासाठी लुईस फिलिप ग्राहकांकरिता विशेष स्पर्धेचे आयोजन करत आहे. कोणत्याही लुईस फिलिप एक्सक्लुसिव्ह स्टोअरमध्ये किंवा वेबसाइट/ॲपवर 4 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबरदरम्यान 20,000 रूपये किंवा त्यापेक्षा अधिक खरेदीसह ग्राहकांना आकर्षक बक्षीसे जिंकण्याची संधी मिळू शकते, जसे: जीवनातील मोठ्या दिवसापूव आठवणींचा संग्रह करण्यासाठी परिपूर्ण लक्झरीअस प्री-वेडिंग शूट. इंद्रियाकडून 2-ग्रॅम सोन्याचे नाणे, जे विवाह सोहळा साजरीकरणामध्ये भव्यतेची भर करते. सहभागाबाबत अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: www.louisphilippe.abfrl.in/sale/wedding-contest लुई फिलिपचे वेडिंग कलेक्शन आता पुण्यातील 10 लुई फिलिप फ्लॅगशिप स्टोअर्स, अधिकृत किरकोळ विक्रेते, www.louisphilippe.abfrl.in वर ऑनलाइन आणि ब्रॅंडच्या मोबाइल ॲपवर उपलब्ध आहे.

# युनिव्हर्सिटी ऑफ मूव्हमेंट अँड डान्सचे (एम. ए. डी.) दरवाजे परत होणार खुले

- ॲमेझॉन एमएक्स प्लेयरतर्फे कॅम्पस बीट्सच्या नव्या सीझनचा ट्रेलर लॉंच
- प्रेम, निष्ठा आणि धोक्यापासून पुरस्कार प्राप्त कॅम्पस ड्रामापर्यंत सगळ्या भावनांची अनुभूती देणारा कॅम्पस बीट्स परत एकदा नाती व नात्याच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात अडकवण्यासाठी सज्ज
- कॅम्पस बीट्स रिबूट 20 नोव्हेंबरपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर मोफत स्ट्रीम होणार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या ॲमेझॉनच्या मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेला कॅम्पस बीट्स या बहुप्रतीक्षीत सीरीजचे अंतिम प्रकरण सादर करताना आनंद होत आहे. कॅम्पस बीट्स रिबूट असे नाव असलेल्या या शोच्या पहिल्या तिन्ही सीझन्सना अभूतपूर्व प्रेम आणि यश मिळाले असून नव्या सीझनमध्ये नाट्य, रोमान्स, जबरदस्त उर्जा असलेल्या डान्स मूव्ह्ज पाहायला मिळणार आहेत. स्ट्रीमिंग सर्व्हिसेसने आज सीरीजचे ट्रेलर जाहीर केले असून त्यात शांतनू माहेश्वरी, श्रुती सिन्हा, सहज सिंग चहल, तन्वी गडकरी, हर्ष डिंगवानी, तान्या भूषण धनश्री यादव, तेरिया मगर, अदनान खान, रोहन पाल यांच्या भूमिका पाहायला मिळणार आहेत. त्याशिवाय मनस्वी वशिष्ट, दीपांकना दास, मनीश कुक्कड त्यात पदार्पण करत आहेत. अनिरुद्ध राजदेरकर यांचे दिग्दर्शन आणि पालकी मल्होत्रा क्रिएटिव्ह निर्मात्या असून नवा सीझन ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर 20 नोव्हेंबरपासून स्ट्रीम होणार आहे. हा ट्रेलर ईशान या बंडखोर स्ट्रीट डान्सरच्या प्रवासाची झलक दाखवतो, ज्यामध्ये तो नेत्राला आपला पार्टनर बनवतो. नेत्रा ही एक निश्चयी वेडिंग डान्सर आहे जी आपल्या कुटुंबाच्या अस्तित्वासाठी झगडत आहे. एकत्रितपणे ते 'रुथलेस' नावाचा आपला डान्स क्रु सुरु करून त्यांच्या युनिव्हर्सिटी ऑफ मूव्हमेंट अँड डान्स म्हणजेच एम. ए. डी चे पुनरुज्जीवन करतात आणि एक असा बंध निर्माण करतात ज्याकडे कोणीही दुर्लक्ष करू शकत नाही. ईशानचा सावत्र भाऊ अहानमधली तीव्र स्पर्धा जागृत होते आणि डान्स फ्लोअरवर आणि आयुष्यातही त्यांची लढत सुरु होते. ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, 'कॅम्पस बीट्सच्या नव्या सीझनसह आम्ही ही गोष्ट फ्रॅंचाईझीद्वारे पुढे नेत आहोत. या सीझनमधे डान्सपासून डान्स बॅटल, रोमान्सपर्यंतची प्रत्येक गोष्ट नव्या उंचीवर नेण्यात आली आहे.' कॅम्पसच्या चौथ्या सीझनमधून पदार्पण करण्याविषयी शांतनू माहेश्वरी म्हणाले, 'कॅम्पस बीट्सच्या सेटवर परतणं घरी परत आल्याची भावना देणारं होतं. इतक्या वर्षांत मी साकारतो ती व्यक्तीरेखा- शांतनूचा माझ्यावर प्रभाव तयार झाला असून त्यातून मला आयुष्यातले काही महत्त्वाचे धडे मिळाले आहेत तसंच नव्या, असामान्य लोकांशी नातं जडलं आहे.

नव्या सीझनसाठी मी उत्सुक आहे आणि मला खात्री आहे, की प्रेक्षक नवी गोष्ट उलगडताना त्यात गुंतून जातील.' कॅम्पस बीट्सच्या क्रिएटिव्ह निर्मात्या पालकी मल्होत्रा म्हणाल्या, 'कॅम्पस बीट्सचा नवा सीझन भरपूर नाट्यासह सादर केला जाणार असून वर्ल्ड डान्स चॅम्पियनशीप जवळ येते तसं त्यातलं नृत्यही नव्या उंचीवर जाणार आहे. प्रत्येक कलाकाराने जबरदस्त काम केलं असून चाहत्यांना त्यांची अनोखी उर्जा अनुभवायला मिळेल. चाहत्यांनी या सीझनची गोष्ट पाहावी यासाठी मी उत्सुक असून यातला आश्चर्याचा प्रत्येक धक्का, तीव्रता त्यांच्या अपेक्षा उंचावेल.'

भावना, महत्त्वाकांक्षा आणि पॅशनचा खेळ पाहाण्यासाठी सज्ज व्हा, कारण कॅम्पस बीट्स रिबूट घेऊन येत आहे, जादू आणि भावनांचा तीव्र खेळ, जो चाहते मिस करत होते. नव्या सीझनचे 20 नोव्हेंबर रोजी ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर स्ट्रीमिंग केले जाणार असून हा शो मोबाइल ॲप, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि कनेक्टेड टीव्हीद्वारे पाहाता येईल.






दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.